# सोलापूर महानगरपालिका सोलापूर

## सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय

## पाणी पुरवठा विभाग

## पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन

सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणारे टाकळी - सोरेगांव दरम्यानची मुख्य पाईप लाईन व्हनमुर्गी फाटया लगत, वडकबाळ टोल नाक्या जवळ व इतर ठिकाणी ना दुरुस्ती होवुन पाण्याची गळती होत आहे. सदरची दुरुस्ती करिता टाकळी येथील पंप बंद ठेवावे लागणार आहेत. सदर गळती दुरुस्तीचे काम सोलापूर महानगपालिके मार्फत बुधवार दि. १८/०१/२०१७ रोजी हाती घेणेत येणार आहे. दुरुस्ती करिता साधारणपणे २० ते २४ तासाचा कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीमध्ये टाकळी - सोरेगांव दरम्यानची मुख्य पाईप लाईन बंद राहणार आहे.

उपरोक्त कारणामुळे बुधवार दि. १८/०१/२०१७ रोजीचा पाणी पुरवठा कमी दाबाने करणेत येईल. तसेच संपूर्ण शहराला दि. १८/०१/२०१७ ते दि. २१/०१/२०१७ या कालावधीत एक वेळेस दोन दिवसाआड ऐवजी तीन दिवसाआड करणेत येणार आहे. सदर कालावधीत शहर व हद्दवाढ भागातील पाणी पुरवठा उशीरा,कमी वेळ व कमी दाबाने होणार आहे. दि. २२/०१/२०१७ पासून पुर्ववत दोन दिवसाआड पाणी पुरवठा करणेत येणार आहे.

सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

प्रति ,

संपादक

दैनिक ------------------

उपरोक्त प्रमाणे पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन आपले दि.१७/ १ /२०१७ रोजी प्रसिध्द होणा-या अंकात बातमी स्वरुपात देणे विनंती आहे.
व १८/१/२०१७

सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर